**<u>निशाणी क्र. ४१ वरील आदेश</u>**

सदर अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ०६ नियम १७ नुसार वादपत्रात दुरुसती करण्याकरीता आहे.

**<u>०२.</u>** अर्ज, म्हणणे व प्रकरण यांचे अवलोकन केले.

**<u>०३.</u>** प्रतिवादी क्र. ०५ तर्फे युक्तीवाद ऐकला. इतरांना पुरेशी संधी दिली, परंतु त्यांचेतर्फे युक्तीवाद करण्यात कोणीही हजर राहीले नाही, करीता अर्ज गुणवत्तेवर निकाली करण्यात येते.

**<u>०४.</u>** अर्जातील थोडक्यात कथन असे की, दावा कायमस्वरुपी मनाई आदेशासाठी आहे. प्रतिवादी क्र. ०५ यांनी प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या जमीनीबाबत अटी व शर्तीचा भंग केला आहे व वादीचा वादमिळकतीमधील जाणे येणेचा शिवरस्ता बंद केल्यामुळे दावा दाखल करणे भाग पडले आहे.

**<u>०५.</u>** अर्जदार वादी यांचे पुढे कथन असे आहे की, ते प्रतिवादी क्र. ०५ यांनी प्रकल्पासाठी प्रदान केलेल्या जमीनीबाबत अटी व शर्तीचा भंग करुन मौजे लिंबाळा ते जांबवाडी

शिवरस्ता तार कुंपन करुन बंद केलेला आहे. यामुळे वादी यांचे अतोनात नुकसान होत आहे अशी दुरुस्ती करु इच्छीत आहेत. शेवटी त्याप्रमाणे दुरुस्तीस परवानगी मागीतली आहे.

**०६.** प्रतिवादी क्र. ०५ यांचे थोडक्यात कथन असे की, दावा बरेच दिवसांपासुन पुराव्यासाठी प्रलंबीत आहे व वादी दावा चालविण्यास इच्छुक नाहीत. प्रतिवादी क्र. ०५ यांनी दावा खारीज करण्यासाठी अर्ज दिल्यानंतर सदर अर्ज दाखल केलेला आहे. वादी नवीन दाव्याचे कारण तयार करत आहेत. दुरुस्तीने दाव्याचे स्परुप बदलणार आहे. दुरुस्तीचे संबंधाने दाव्यात विनंतीमध्ये कोणतीही दुरुस्तीची मागणी नाही. शेवटी अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०७.** मौजे लिंबाळा मक्ता, ता.जि. हिंगोली येथील सर्वे क्र. ०६ मधील ०२ हे. १५.३७ आर या अकृषीक जमीनीचे पुर्वेस– लिंबाळा मक्ता ते जांबवाडी हा शिवरस्ता दाव्याचा विषय अर्थात वाद मिळकत आहे. वादपत्राप्रमाणे सदर शिवरस्ता मौजे लिंबाळा रस्ता व जांबवाडी या दोन गावामधील पुर्वापार चालत आलेला रस्ता आहे. सदर शिवरस्ता यांच्या पश्चिमेस– वादी यांची जमीन व पुर्वेस– प्रतिवादी क्र. ०५ यांना प्रदान करण्यात आलेली जमीन आहे. वादी यांना सदर शिवरस्त्याशिवाय पर्यायी रस्ता उपलब्ध नाही, असे असतांना प्रतिवादी

क्र. ०५ वादी यांचे मिळकतीचे पुर्वेस लगत व शिवरस्तयाचे पश्चिमस गैरकायदेशीर तारकुंपन करत आहेत. त्यामुळे त्यांना प्रतिबंध करण्याकरीता दावा दाखल केलेला आहे. शेवटी वादी यांनी वरीलप्रमाणे तारकुंपन करु नये व वहीवाटीच्या रस्त्यामध्ये अडीअडथळा करु नये म्हणुन कायमस्परुपी मनाई आदेशाची विनंती केलेली आहे.

<u>०८.</u> दुरुस्तीची मागणी करुन वादी हे प्रतिवादी क्र. ०५ यांनी वरील वादरस्ता त्यांना प्रदान करण्यात आलेल्या जमीनीबाबत अटी व शर्तीचा भंग करुन तो तारकुंपन करुन बंद केले बाबत कथन वादपत्रात समाविष्ट करु ईच्छीत आहे. थोडक्यात मुळ कथन प्रतिवादी क्र. ०५ हे वादी यांचे हक्काचा रस्ता बंद करत आहेत असे असुन त्यांना मनाई करण्याकरीता विनंती आहे व सदर अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्र. ०५ यांनी वादरस्ता बंद केलेला आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे वाद रस्ता बंद केला असेल तर कायमस्वरुपी मनाई आदेशाची एकमेव मागणी पुरेशी नाही, तो रस्ता खुला करण्याकरीता देखील मागणी आवश्यक आहे. परंतु, वादी यांनी विनंतीमध्ये कोणतीही दुरुस्ती मागीतलेली नाही. शिवाय सदर रस्ता कधी बंद केलेला आहे याबाबत देखील कोणतेही कथन नाही. प्रतिवादी क्र. ०५ यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या मिळकतीबाबत अटी शर्तीचा भंग केला आहे काय? यापेक्षा वादरस्त्यावर वादी यांचा हक्क आहे काय ? हे महत्वाचे आहे. वादरस्त्यावरील हक्क दाखवुन देणेकरीता पुरावा म्हणुन वादी संबंधीत

अटी व शर्तीचा आधार घेवु शकतो. अशा परिस्थीतीत सर्व कारणांचा विचार करता मागीतलेली दुरुस्ती वाद योग्य प्रकारे कायमस्वरुपी निकाली काढण्याकरीता पर्यात्प नाही. या दुरुस्तीने वाद योग्य प्रकारे व कायमस्वरुपी निकाली काढणेकरीता कोणतेही साध्य होणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर होणेस पात्र. करीता खालील आदेश.

**आ दे श**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by SHARAD GINYANADEV DUBALE
Date: 2026.08.10 18:04:40 +0530

**( श. गि. दुबाले )**
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
हिंगोली ता.जि. हिंगोली

**दिनांक : १०/०८/२०२६**

**प्र मा ण प त्र**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखकाचे नांव** | : | **सुरेंद्रसिंह जयसिंह राजपुत** |
| **न्यायालयाचे नांव** | : | सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, हिंगोली |
| **पिठासिन अधिकारी** | : | **शरद गिन्यानदेव दुबाले** |
| **न्यायनिर्णय/आदेश दिनांक** | : | १०/०८/२०२६ |
| **न्यायनिर्णय/आदेश स्वाक्षरी दि.** | : | १०/०८/२०२६ |
| **न्यायनिर्णय अपलोड दिनांक** | : | **१०/०८/२०२६** |